Estd.1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF – 28th Rank

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र

वेबसाईट : www.unishivaji.ac.in

E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in

दूरध्वनी :– 2609102, 2609103, 2609101

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/एसकेएम/2758 दि. १६ सप्टेंबर, २०१७

## तातडीचे

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित एस.आर.पी.डी संबंधित कला व विज्ञान महाविद्यालये व परिसंस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय:- ऑक्टोबर/नोव्हेंबर/डिसेंबर, २०१७ या सत्रातील सैध्दांतिक परीक्षेसाठी प्रश्नपत्रिकाचे वितरण ई-मोडद्वारे एसआरपीडी (Secured Remote Paper Delivery System) प्रणालीमधून करणेबाबत...

संदर्भ:- १) शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/२०३३ दि.०१ ऑगस्ट, २०१७ चे परिपत्रक
२) शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/एसकेएम/२५९७ दि. ०८.०९.२०१७ चे परिपत्रक

महोदय/महोदया,

वरील संदर्भीय क्र. २ परिपत्रकानुसार आपणास कळविण्यात येते की, ई-मोडद्वारे (SRPD) प्रश्नपत्रिका वितरणाचे कामकाज विद्यापीठाकडून कोणकोणत्या परीक्षेचे करण्यात येणार असल्याचे कळविणेत आले आहे.

यासंदर्भात दि. १३ व १४ रोजी कोल्हापूर, सांगली व सातारा येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये बी.ए./बी.एस्सी. सत्र VI च्या विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म भरताना अडचणी उद्‌भवत असल्याचे निदर्शनास आल्याने बी.ए.भाग-३/सत्र-६ व बी.एस्सी. भाग-३ सत्र-६ च्या सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिका ई-मोडद्वारे पाठविण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

तेव्हा ज्या कला व विज्ञान महाविद्यालयांनी अद्याप या कार्यप्रणालीसाठी MKCL प्रणालीत Registration केलेले नाही, त्या महाविद्यालयामधील प्राचार्य/विद्यापीठातील अधिविभाग प्रमुख व परीक्षा संबंधित काम करणारा तांत्रिक सेवक यांचेसाठी **मंगळवार दि. १९/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता गणित अधिविभागातील सभागृहामध्ये प्रशिक्षण** आयोजित केले आहे. तरी सर्वांनी वरील तारखेस उपस्थित राहून Registration ची प्रक्रिया पूर्ण करावी अथवा त्यामध्ये काही नव्याने बदल करावयाचे असल्यास करण्यात यावेत व त्यासंबंधीची माहिती सोबतच्या प्रपत्रामध्ये भरुन घेवून यावे. तसेच प्रश्नपत्रिका डाऊनलोड करण्यासाठीचे प्रशिक्षण घ्यावे व परीक्षा सुरळीत पार पाडण्यास सहकार्य करावे. ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(महेश काकडे)
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ